**नि.दि.दा.क्र. १०७/२०१९.**
**विकास ..विरुध्द.. संजय.**

**<u>आदेश निशानी क्र. ५ खाली</u>**
(दि.२२०६.२०२२)

प्रस्तुत अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ३९ नियम १ व २ आणि कलम १५१ अन्वये दाखल करुन प्रतिवादी क्र. १ याने दाव्यातील पायवा बुजविण्यासंबधी व शेड काढण्यासंबंधी आदेशात्मक तात्पुरता मनाई हुकूम मिळण्याकरिता दाखल केला आहे.

२. प्रस्तुत अर्जावर वादी आपला युक्तीवाद करित असताना प्रतिवादी यांनी अभिवचन निशानी ४८ दाखल करुन त्यातील अटी दाव्याचा निकाल लागे पावेतो बंधनकारक राहील असे नमुद केले आहे. त्यामुळे वादीतर्फे पुढे युक्तीवाद पुर्ण करण्यात आला नाही. वादीच्या वकीलांनी अर्ज निशानी ५वर प्रतिवादीने दाखल केलेल्या अभिवचनास अनुसरुन आदेश होण्याची विनंती केली.

३. अर्ज निशानी ५ मध्ये प्रतिवादीने वादीच्या घराचे प्लॉटच्या सिमेपासुन साडेपाच फुटाच्या आत कोणत्याही प्रकारचे बांधकाम करुन वादीच्या कब्जे वहीवाटीला अडथळा करु नये असा तात्पुरता मनाई हुकुम मिळण्याची विनंती केली आहे. प्रतिवादी क्र. १ याने सदर बाब मान्य करुन अभिवचन दिले आहे की, ''तो त्याच्या मालकीचा नगर भुमापन क्र. ६५१६मध्ये नगर परिषद, उमरेड यांनी दि.२७.०५.२०२२ रोजी बांधकाम परवानगी क्रमांक एम.सी.यु३०५/बी.डी.२०२२ अन्वये दिलेल्या परवानगी नुसार बांधकाम करेल. सदर बांधकाम करताना तो वादीच्या दक्षिणभिंती पासून नगर परिषद बांधकाम मंजुरी नुसार १.५० मीटर (अंदाजे ५ फुट) अंतर सोडून बांधकाम करेल. बांधकाम करताना प्रतिवादी क्र.१ ने केलेले कॉलमचे गड्डे जोत्याचे बांधकाम झाल्याबरोबर बुजविण्यात येईल. सदर अटी दाव्याचा निकाल लागे पावेतो प्रतिवादी क्र. १ याचेवर बंधनकारक राहील.'' सदर अभिवचनातील अट वादीने देखील मान्य केली आहे. वादीने निशानी क्र. ५ मध्ये मागीतलेल्या इतर मागण्याविषयी युक्तीवाद केला नाही. तसेच, त्या संबंधी वाद राहीला नसल्याचे दिसुन येते. त्यामुळे दाव्यातील

गुणदोषांचा तसेच दोन्ही पक्षांनी दाखल केलेल्या कागदपत्रांचा सखोल विचार न करता त्यांच्यामध्ये झालेल्या आपसी समझोत्याने सदर अर्जावर खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. १याने निशानी क्र.४८ वर दाखल केलेल्या अभिवचनातील अटीस अधीन राहुन वादीच्या दक्षिण भिंतीपासुन नगर परिषद बांधकाम मंजूरी नुसार अंदाजे ५ फुट अंतर सोडून बांधकाम करावे व त्याने केलेले कॉलमचे गड्डे जोत्याचे बांधकाम झाल्याबरोबर बुजवुन दयावेत.

दि. २२.०६.२०२२.

(जा.म.मिस्त्री)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
उमरेड.